# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/07/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## जबर दुखापत

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर काटोल बस स्टॉप जवळ बिकानेर हॉटेल समोर फिर्यादी नामे— शिवानीताई शशीकांत सिलाम, वय २६ वर्ष, रा. अनुसयापुरम काटोल हिचे पती हे ऑफिसच्या कामाने नागपुर येथे गेले होते. सायं. ७.०० वा. पर्यंत घरी आले नाही म्हणुन फिर्यादीने त्यांना फोन केला तेव्हा त्याने सांगितले की बसमध्ये आहे काटोलला येत आहे. पुन्हा ८.३० वा. फोन केला पण त्यांनी फोन उचलला नाही नंतर १०.३० वा. दरम्यान भगवान पाटील साहेबांनी फोन करून सांगितले की, शशिकांत दिनेशराव सिलाम, वय ३१ वर्ष, रा. यांचे सोबत त्याचे मित्र **आरोपी नामे— मेघदुत मोरे, रा. पेठबुधवार** यांचा झगडा झाला आहे. शशीकांत यांचे डोक्याला मार लागला असुन रक्त निघत आहे. त्यांना सरकारी हॉस्पीटल काटोल येथे नेत आहे. नंतर फिर्यादी पुन्हा रात्री ११.३० वा. फिर्यादी आपले पतीसोबत फोनवर बोलली त्यांनी म्हटले की, दिनांक १३/०७/२०२३ रोजी रात्री ९.३० वा दरम्यान काटोल बस स्टॉप जवळ असलेल्या बिकानेर हॉटेल समोर फिर्यादीचे ऑफिसचे मेघदुत मोरे यांचे सोबत किरकोळ कारणावरून भांडण झाले होते मेघदुतने फिर्यादीचे डोक्याच्या मागचे भागास डोक्याचे वर हाताचे कडयाने मारून जखमी केले रक्त निघत असल्याने पुढील उपचाराकरिता नागपुर येथे नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३२६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार रूडे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर